महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्र.१६३(३)/२०१९/१४-ब** **दिनांक १३ ऑगस्ट, २०२१**

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- कोरोना विषाणू (Covid १९) च्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने मुलाखतीकरीता उमेदवारांना सूचनांबाबत.**

**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०४/२०१९ व अधिसूचना क्रमांक १२/२०१९.**

**कोरोना विषाणूचा(Covid १९) प्रादुर्भाव वाढू नये यासाठी उमेदवारांनी घ्यावयाची काळजी :-**

(१) मुलाखतीला येताना किमान तीन पदरी कापडाच्या मास्कचा (Mask) वापर करणे अनिवार्य आहे.
(२) वैयक्तिक स्वच्छतेचे पालन काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.
(३) उमेदवारांकडे स्वतःचा सॅनिटाईझर असावा व त्याचा वेळोवेळी वापर करावा.
(४) शारीरिक / परस्पर अंतराच्या (Social Distancing) नियमावलीचे कटाक्षाने पालन करावे.
(५) कोव्हिड-१९ सदृश्य लक्षणे जसे की ताप, सर्दी, खोकला इत्यादी दिसून येत असल्यास कार्यालयास आगाऊ कळवावे.
(६) जंतु संसर्ग टाळण्यासाठी नाक, तोंड व डोके यांना स्पर्श करणे टाळावे.
(७) टिश्यू पेपरचा वापर असल्यास वापरानंतर तो तात्काळ बंद कचरापेटीत फेकून द्यावा.
(८) कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी शासनाने दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**ठिकाण- मुंबई.**

**उपसचिव, परीक्षा-२**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**